महाराष्ट्र शासन
स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
कोकण भवन, सहावा मजला, नवी मुंबई ४०० ६१४.
☎/🖷:- २२,२७५७१३९१ Website:www.mahalfa.in E.Mail: *ad.prc@mahalfa.in*

क्र.स्था.१८/ब/पं.रा.स./लेपपुअ/२०१७-१८

**स्थायी आदेश क्र.०५/२०१८, दिनांक ११/०९/२०१८**

**विषय :-** लेखापरीक्षण अहवालामधील आक्षेपाबाबत

जिल्हा कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या जिल्हा परिषद विभागांच्या अहवालांची तपासणी केली असता अहवालामधील आक्षेपांचे गांभीर्य व स्वरुप, परिच्छेदांची मांडणी, भाषा शैली तसेच निश्चित पूर्तता नमूद करणे इत्यादीबाबतीत असमाधानकारक असून सुधारण्यास लक्षणीय वाव असल्याचे आढळून आले आहे.

आक्षेपात बऱ्याचदा योग्य / काहीच निष्कर्ष नोंदविले जात नाहीत, वसुलपात्र रकमांना शासनाची मान्यता (नियमात तरतूद नसताना) घ्यावी व खुलासा करावा अथवा लेखापरीक्षणाची खात्री पटवावी अशा प्रकारे अभिप्राय देऊन अधांतरी विषय सोडला जातो. तसेच अहवालाचे अंतिमीकरण / निर्गमन करण्यापूर्वी अहवालाचे काळजीपूर्वक वाचन करुन परिच्छेदांची मांडणी मुद्देनिहाय योग्य निष्कर्षासह, प्राधिकारासह व विषयवार सलग आहे आणि बांधकामावरील आक्षेपात मोजमापामधील त्रुटींचे (काळजीपूर्वक तपासणी करुन) आक्षेप आहेत, खरेदीबाबत सर्वंकष तपासणीअंती आक्षेप आहेत, इत्यादी न पाहता सोपस्कार म्हणून कार्यवाही केल्याचे निदर्शनास येते.

**जिल्हा परिषद विभाग, पंचायत समित्यांचे तसेच इतर संस्थांचे लेखापरीक्षण अहवाल तयार करताना खालील सुचनांचे काटेकोर पालन करण्यात यावे.**

१) आकृतीबंधापेक्षा जास्त कर्मचाऱ्यांचे वेतन आहरित करणे, शिक्षक समायोजन यासारख्या परिच्छेदांमध्ये कर्मचाऱ्यांच्या संख्येबरोबरच त्यांच्या वेतनावर झालेला खर्च अक्षेपात नमूद करुन तो वसुलपात्र ठरविणे आवश्यक आहे. चाचणी लेखापरीक्षण केले जात असल्याने त्याअनुषंगाने चाचणी लेखापरीक्षणात आढळलेल्या ह्या अनियमितपणा / ही अतिप्रदाने असून वर्षात अशी अन्य प्रकरणे प्रशासनाने तपासून कार्यवाही करण्याबाबत अभिप्राय नोंदवावेत. अशा परिच्छेदांचे अनुपालनात जर प्रशासनाने निवडक महिन्याशिवाय अन्य कालावधीत असे नियमबाह्य प्रदान नाही म्हणून उत्तर दिले, तर पुढील लेखापरीक्षणाचेवेळी निवडक महिन्याव्यतिरिक्त कालावधीतील एखाद दुसऱ्या महिन्याची या बाबी पुरती तपासणी करुन खात्री करावी व जर चूक आढळली तर पूर्तता अपूर्ण म्हणून पुढील अभिप्राय देऊन पूर्ण छाननीअंती पूर्तता देण्यास सूचीत करावे.

२) बांधकाम / लघुपाटबंधारे / ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या अहवालात

**अ)** जेव्हा निविदा अंदाजित रकमेपेक्षा जास्त दराने स्वीकारण्यात येतात, तेव्हा अंदाजित दरापेक्षा जादा दराने येणारे आधिक्य हे मंजूर करुन मगच निविदा स्वीकारावी अशी विहीत पध्दत आहे. याबाबत महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेच्या परिशिष्ठ ४२ मधील अनुक्रमांक २० (परिच्छेद २१७ बाबत) समोरील टिप ४ आणि शासन सार्वजनिक बांधकाम विभागाचे परिपत्रक क्रमांक सीएसटी-१०८६/सीआर-१९६/इमारती-२, दिनांक ५ जून १९८६ अभ्यासावे. अंदाजित दरापेक्षा जेवढे जास्त दर स्वीकारण्याचा प्रस्ताव असतो, तेव्हा त्या जादा दरामुळे येणारे आधिक्य कोणत्या कारणास्तव किती रकमेपर्यंत (तपशीलवार आकडेमोडी आधारे) समर्थनीय आहे याचे कारणनिहाय विश्लेषण (याबाबत आधी घेतलेले कंत्राटदाराचे लेखी निवेदन व त्या अनुषंगाने ग्राह्य कारणाबाबत ग्राह्य मर्यादेपर्यंत विश्लेषण) नमूद करुन जादा दराचे समर्थन कार्यकारी अभियंत्यानी देणे आवश्यक आहे. त्यानुसार जादा दर स्वीकृती झाली नसेल तर असा स्पष्ट अभिप्राय नोंदवून निविदा स्वीकृतीमध्ये आधिक्याची रक्कम अमान्य करणे व वसुलपात्र दर्शविणे जरूर आहे.

**ब)** बऱ्याच बाबतीत बांधकामाबाबत कलम ३८ संबंधित आक्षेप अन्वयार्थाने नोंदले आहेत असे आढळले आहे त्या कलमानुसार जर परिणामाचा विचार केला तर निविदेतील एखाद्या बाबीचे परिमाणाहून १२५% पेक्षा जास्त परिमाणासाठी व जर रकमेचा विचार केला तर एखाद्या बाबीकरीता निविदेत असलेल्या रकमेपेक्षा रुपये ५०००/- हून अधिकच्या खर्चाच्या कामासाठी (जे जास्त असेल ते) हे कलम लागू होते. अशा जास्त कामासाठी चालू जिल्हा दर सूचीपेक्षा जास्त नाही अशा दराने प्रदान देय होते. त्यामुळे निविदेतील तरतुदीपेक्षा सर्व जादा खर्च अथवा १२५% हून वा रुपये ५०००/- वरील जादा खर्च संपूर्णत: अमान्य करणे अयोग्य आहे. तर फक्त निविदा दरापेक्षा जास्त दरामुळे होणारा जादा खर्च वसुलपात्र होऊ शकतो. (अंदाजपत्रक चुकीचे / निष्काळजीपणे केल्यामुळे जास्तीच्या परिणामासाठी जादा दर द्यावा लागल्याने अन्यथा ते परिमाण निविदेत अंतर्भूत झाले असते म्हणून) त्याचप्रमाणे चालू दर सूची वापरल्याने या कलमानुसार होणाऱ्या प्रदानावर भाववाढ देय नाही व तसा आक्षेप घेणे योग्य आहे. तसेच शासन पाणी पुरवठा विभाग, परिपत्रक दिनांक १५/०७/१९९४ व परिपत्रक ग्रामविकास विभाग, क्र.झेडपीए-१०९७/प्र.क्र.१९४३/३३, दिनांक ०४/०९/२००० नुसार अशा प्रकरणी एकूण जादा खर्चाबाबत जबाबदारी ठरविण्याच्याही सूचना आहेत. बऱ्याचदा या कलमाखाली येणारी प्रकरणेही जादा खोदकामामुळे उद्भवल्याचे व तेही जास्त दर असलेल्या कठीण खडक खोदाईतील कामामुळे असल्याचे आढळते. तेथे तांत्रिक मान्यतेचे अंदाजपत्रक बनविताना जे खोदकामाच्या अंदाजासाठी चाचणी खड्डे (ट्राय पिट्स) घेतात त्याचे निष्कर्ष व प्रत्यक्ष खोदकामात दाखविलेले काम यांची तुलना करुन तसेच जमिनीवरील कामात वाढ असल्यास निष्काळजीपणा असल्यास त्यानुसार जबाबदारीचा व वसुलीचा मुद्दा उपस्थित करणे जरुर आहे.

**क)** स्वामित्व धन वसुली संदर्भात महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई अधिसूचना दिनांक १५/०१/२००३ महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई अधिसूचना दिनांक १५/१२/२००६, ११/०२/२०१० व ११/०५/२०१५ अन्वये स्वामित्वधनाची परिगणना करुन वसुली करणे आवश्यक

आहे. तसेच याबाबत वेळोवेळी अद्ययावत दरांची माहिती जिल्हा स्तरावर महसूल विभागाकडून घेऊन योग्य आक्षेप नोंदवावेत.

**ड)**महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग आठ,असाधारण दि.२४.०४.२०१५ क्र.४७ Maharashtra Stamp Act (Amendment) Act,2015 (mah.act No.XX of 2015 ) मधील परिच्छेद क्र.३४ मध्ये केलेल्या सुधारणा अन्वये रुपये १० लक्षपर्यंत ५००/ व त्यापुढील ( रक्कमेच्या ०.१% दराने ) प्रत्येक एक लाखास १००/- प्रमाणे मुद्रांक जोडणे आवश्यक आहे. त्यानुसार करारनामे झाल्याचे पाहून आक्षेपात शासन नुकसान रक्कम नमूद करणे आवश्यक आहे. ( हा मुद्दा सार्वत्रिक एकच परिच्छेद घेऊन कामाची यादी व नुकसान रक्कम द्यावी )

**इ)** शासन निर्णय क्रमांक जिपर/२०००/प्र.क्र.८३७/३५, दिनांक ०८/०५/२००२ व शासकीय विमा निधी यांचे पत्र दि.०८/०९/२०१० अन्वये कामगारांचा विमा उतरवला नसल्यास त्याची परिगणना करुन रक्कम आक्षेपात नमूद करणे आवश्यक आहे. (हा मुद्दा सार्वत्रिक असल्यास त्या वर्षात दिलेल्या कार्यादेशानुसार विम्याची व हप्ता प्रदानाची माहिती अर्धसमास ज्ञापनाने मागवून एकच परिच्छेद करावा व परिशिष्ठात कामांची नावे व रक्कम नमूद करावी )

**फ)** कंत्राटदाराने विहित मुदतीत काम न केल्यास मुदतवाढ देताना महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ नियम १४९ अन्वये नुकसान भरपाई वसुल करण्याची तरतूद आहे. याबाबत बहुतेक दंड / पेनल्टी असे शब्द वापरण्यात येतात, परंतु ते चुकीचे आहेत. प्रमाणित बी-१ निविदा नमुन्यतील कलम २ व ४ नुसार ही कार्यवाही होते व त्यास नुकसान भरपाई (कॉम्पेन्सेशन) असे म्हटले आहे. नुकसान भरपाईची रक्कम ठरविण्याचा अधिकार हा बऱ्याचदा विवेकपूर्ण वापरला जात नाही व नगण्य रकमेचा प्रतिदिन दर नुकसान भरपाई म्हणून (कोणत्याही सबळ समर्थनाविना) लागू करण्यात येतो. हे गैर व सार्वजनिक हिताविरुध्द आहे. त्यामुळे नुकसान भरपाई रक्कम निश्चित करताना कामास विलंब झाल्यामुळे अपुर्ण कामात गुंतलेल्या रकमेवरचे झालेले व्याजाचे नुकसान, कामाच्या सनियंत्रणासाठी वापरण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्त्यावरील खर्चाचा व विचाराधिन कामाचा हिस्सा, सदर काम वेळेत पूर्ण न झाल्याने त्यापासून जनतेला मिळणाऱ्या लाभाचे झालेले नुकसान वा जनतेस येणारा जादा खर्च (जसे पाणीपुरवठा योजना न होण्याने त्यांना आरोग्यावर करावा लागणारा खर्च, रस्ता न होण्याने वाहनांचे नुकसान व जादा इंधन खर्च इत्यादी ) अशा सर्व अनुषांगिक बाबींचा विचार करुन त्या आधारे प्रतिदिन नुकसान भरपाई दर ठरविणे जरुर आहे. लेखापरीक्षणात आक्षेप या प्रकारे घ्यावा.

**ग)** बांधकामात अंदाजपत्रकीय परिमाणापेक्षा जास्त किंवा कमी काम झालेबाबत आक्षेप नमूद करताना कोणत्या बाबीवर जास्त खर्च झाला व कोणत्या बाबीवर कमी खर्च झाला यासह एखादी बाब कार्यान्वित करण्यात आली नाही याचा तपशील आक्षेपात नमूद करण्यात यावा. त्याचबरोबर संलग्न बाबीमधील विसंगतीमुळे (उदा.पायासाठी कमी लांबीची खोदाई झाली तर पायाची भिंतही कमी लांबीची होईल, जेवढे जमिनीवरील भिंतीवर गिलाव्याचे काम तेवढेच साधारणत: रंगकाम होते) अशा बाबी विचारात घेवून होणारी वसुली नमूद करुन आक्षेप नोंदवावा.

शासन, पाणीपुरवठा विभाग, परिपत्रक दिनांक १५ जुलै १९९४ अन्वये खोदकामात कठीण खडकांचे खुदाईचे परिमाण वाढल्यास जादा झालेल्या खर्चाची जबाबदारी ही ट्रायल पीट घेऊन

अंदाजपत्रक तयार करणाऱ्या कर्मचाऱ्यावर निश्चित केली जात असल्याने याबाबींकडे कटाक्षाने लक्ष देणे आवश्यक आहे.

**म)** ज्यावेळी कंत्राटदाराची निविदा स्वीकारल्याचे पत्र दिले जाते त्यावेळी भारतीय कंत्राट कायदा १८७२ मधील कलम ४ नुसार करार विधीवत अस्तित्वात येतो आणि त्याचवेळी निविदेतील अटी व शर्ती त्यास लागू होत असल्याने करारनामा तयार करताना प्रोसिजरल त्रृटी राहिल्यास त्याबाबत आक्षेप घेऊन ही काहीही साध्य होत नाही हे लक्षात घ्यावे. मात्र जर चुकीची अट (उदा.जर क्रमांक झेडपीए/१०९७/प्र.क्र.१९४३/३३, दिनांक ०४/०९/२००० च्या ग्रामविकास विभागाच्या परिपत्रकाने भाववाढ कलम " करारात घेवू नये असे असताना " घातली ) असेल तर त्यानुसार वसुली दर्शवावी.

**भ)** बांधकामे तपासताना निवडक महिन्यातील व आढावा महिन्यातील पूर्ण व अपूर्ण कामे पाहवयाची आहेत. अपूर्ण कामे पाहवयाची नाहीत ही धारणा चूकीची आहे.

**३)** कृषि / पशुसंवर्धन / समाजकल्याण / महिला व बालकल्याण विभागाकडील वैयक्तिक लाभाच्या योजनाबाबत परिच्छेद लिहीताना खालील बाबींवर लक्ष केंद्रित करुन आक्षेप नोंदविण्यात यावेत.

**अ)** शासन निर्णय ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग दिनांक २०/१०/१९९९ व वेळोवेळी त्यामध्ये सुधारणा केलेल्या शासन आदेशामधील सुचनानुसार सर्व प्रक्रीया योग्य प्रकारे अंमलात आणून लाभार्थी निवड झाली आहे काय हे तपासून त्याप्रमाणे आक्षेप लिहीणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कृषि, पशुसंवर्धन व महिला व बालकल्याण विभागाकडील लाभार्थी निवडीच्या अटी व शर्ती नुसार लाभार्थी निवड झाली आहे का हे तपासून आक्षेप लिहीणे (दिनांक २०/१०/१९९९ च्या शासन निर्णयातील मार्गदर्शक तत्वांचा आधार जरुर तेथे संदर्भासह घेण्यात यावा.) आवश्यक आहे. आक्षेपात निवडलेल्या लाभार्थींची संख्या लिहावी व योजनेच्या अटींची पूर्तता करतात काय याचे भाष्य करावे. तसे नसेल तर संबंधितांच्या नियमबाह्य कृतिबद्दल आवश्यक त्या वसुलीसह कार्यवाहीचाही आक्षेप नमूद करण्यात यावा. त्यासाठी प्रत्येक योजनांचे लाभार्थी प्रस्ताव लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करुन देणेसाठी अर्धसमास ज्ञापन देऊन माहिती मागविणे जरुरीचे आहे. सदर अर्धसमास ज्ञापन वित्त विभागामध्ये प्रमाणकांचे रेखांकन करतानाच देणेत यावेत. याबाबत स्थायी आदेश क्रमांक ७, दिनांक १८/०४/२०१७ व स्थायी आदेश क्रमांक ८ दिनांक १५/०५/२०१७ नुसार दिलेल्या सुचनांप्रमाणे कार्यवाही व्हावी.

**ब)** लाभार्थी निवडीनंतर व लाभार्थी हिस्सा वसुलीनंतर पुरवठा आदेश दिला आहे काय, साहित्य विहीत कालावधीत प्राप्त झाले काय नसल्यास दंडात्मक कार्यवाहीच्या तरतुदीनुसार दंड वसुली परिगणित करुन तो वसुल झाल्याची खात्री करण्यात यावी. योग्य लाभार्थ्यास वेळेत साहित्य वाटप झाले हे पहाणे आवश्यक आहे, वाटपा अभावी शिल्लक राहिलेल्या साहित्यामुळे नाहक रक्कम गुंतून पडलेल्या रकमेवरील व्याजाची (१८% द.सा.द.शे.) परिगणना करण्यात यावी. आक्षेपात लाभार्थी हिस्सा रक्कम किंवा त्यापैकी किती वसुल झाली व वसूल व्हावयाच्या रकमेचा तपशील देणे आवश्यक आहे. अपात्र लाभार्थी निवडले असल्यास त्यावरील खर्च वसुलीची रक्कम नमूद करणे आवश्यक आहे.

**क)** खरेदी केलेले साहित्य हे दर करारावर खरेदी केले असल्यास दर करार क्रमांक, दर कराराचा कालावधी, पुरवठादाराचे नाव, वस्तूंचा दर व संख्या नमूद करणे आवश्यक आहे. निविदा पध्दती अन्वये खरेदी केली असल्यास निविदा मागणी वा स्वीकृतीबाबत भाष्य करुन वस्तूचा पुरवठादार व दर नमुद करणे आवश्यक आहे. पुरवठादारांस जिल्हा परिषद, पंचायत समितीने अदा केलेली एकूण रक्कम व योजनेच्या अटी शर्तीनुसार लाभार्थींकडून वसुल करावयाची लाभार्थी हिश्याची रक्कम या खरेदी केलेल्या वस्तूंच्या किंमतीशी जुळतात काय याचा ताळमेळ घेण्यात यावा.

**ड)** एकाच प्रकारच्या वस्तूसाठी जिल्हा परिषदेच्या वेगवेगळया विभागात खरेदीसाठी तसेव पंचायत समितीमधील खरेदीसाठी दिलेल्या दराची तुलना करण्यात यावी. तफावत असल्यास झालेल्या नुकसानीची परिगणना करण्यात यावी व रक्कम आक्षेपात नमूद करण्यात यावी.

**इ)** मोठया प्रमाणावरील (शालेय साहित्य, लेखन सामग्री इत्यादी) खरेदीबाबत गरज निश्चित कशी केली (यापूर्वीची खरेदी, सध्याची शिल्लक किंवा उपलब्धी वापराचे प्रमाण / निकष, याआधारे निघणारी गरज) हे तपासून मगच निविदा इत्यादीबाबतची तपासणी करावी. तसेच सर्व प्राप्त साहित्य योग्य त्या लाभार्थी वापरदारापर्यंत पोहचून त्याचा लाभ / वापर झाल्याचे अभिलेख तपासावेत.

**फ)** शासन निर्णय कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभाग क्रमांक सुकृऔ-२०१६/प्र.क्र.३०१/११/अे, दिनांक २१/०१/२०१७ व शासन निर्णय नियोजन विभाग क्रमांक डिसीटी २३१६/प्र.क्र.१३३/का.१४१७, दिनांक ०५/१२/२०१६ नुसार थेट लाभ हस्तांतरण (DBT) पध्दत अनुसरण्याची पध्दत विषद केलेली आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केली जाते अगर कसे याबाबत खात्री करणेत यावी.

**४)** लेखापरीक्षण अहवालात चाचणी लेखापरीक्षण करताना निदर्शनास आलेल्या उणीवा व वसुली वर्षातील इतर महिन्यातील खर्चाचा आढावा घेऊन वसुलीच्या रकमा परिगणित करण्याबाबतच्या सूचना जिल्हा परिषद / पंचायत समिती यांना आक्षेपात नमूद करण्यात याव्यात. त्यांनी केलेली परिगणनेची सत्यता पडताळणीसाठी अनुपालनाच्या तपासणीच्या वेळी चाचणी लेखापरीक्षणास घेतलेल्या महिन्यांव्यतिरिक्त अन्य महिन्यातील एखाद्या महिन्याची फेरतपासणी करावी. आक्षेपाप्रमाणे पूर्तता झाल्याची खात्री करावी. अन्यथा आढळलेल्या त्रृटींसह पूर्ततेकरीता पुढील अभिप्राय द्यावेत.

**५)** वित्त विभागाच्या अहवालात दर्शविलेली अखर्चित रक्कम व इतर विभाग व पंचायत समित्यांमधील दर्शविलेली अखर्चित रक्कम यांचा ताळमेळ घेण्यात यावा. अशा ताळमेळाप्रमाणे रकमेचा आक्षेप वित्त विभागात दर्शविण्यात यावा.

**६)** लेखापरीक्षण अहवालाच्या शेवटी जोडण्यात आलेली विवरणपत्रे, परिशिष्ठे ही या विभागाकडून कोणीही स्वाक्षांकीत केलेली नसतात. त्यामुळे त्याचे सत्यतेबाबत साशंकता निर्माण होते. बऱ्याचदा अशा विवरणपत्रांवर संबंधित संस्थेच्या अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या असतात / नुसते पदनाम असते हे अग्राह्य आहे. विवरणपत्रातील, परिशिष्ठातील माहिती लेखापरीक्षणाच्या सुरुवातीसच अर्धसमास

ज्ञापनाद्वारे मागविण्यात यावी व त्यांची योग्य अभिलेख्यांच्या आधारे पडताळणी करुन तयार करण्यात आलेले विवरणपत्र, परिशिष्ठ संबंधित लेखापरीक्षकांनी स्वाक्षांकीत करावे. निर्गमित केलेले अर्धसमास ज्ञापने व जिल्हा परिषद / पंचायत समिती यांचेकडून प्राप्त होणारी माहिती मूळ अहवालाच्या नस्तीमध्ये समाविष्ठ करावी.

**७)** वरील सूचना जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका व ग्रामपंचायत लेखापरीक्षणाबाबत यथास्थिती लागू राहतील. ह्या सूचनांची प्रत्येक लेखापरीक्षा अधिकारी व लेखापरीक्षकांनी नोंद घ्यावी व सर्व कार्यालय प्रमुखांनी त्याबाबत कार्यवाही होईल असे पहावे.

सदर स्थायी आदेश संचालनालयाचे www.mahalfa.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

(प्रताप मोहिते)
संचालक
स्थानिक निधी लेखापरीक्षा
महाराष्ट्र राज्य.

प्रत :- माहिती तथा आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित

१) सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, विभागीय कार्यालय कोंकण / पुणे / नाशिक / औरंगाबाद /अमरावती / नागपूर.
२) सहसंचालक (मनापालेप) स्थानिक निधी लेखापरीक्षा,नवी मुंबई
३) सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा सर्व.
४) लेखापरीक्षा अधिकारी, स्थानिक निधी लेखापरीक्षा सर्व.
५) सहाय्यक लेखापरीक्षा अधिकारी, स्थानिक निधी लेखापरीक्षा सर्व.
६) अभिलेखापाल.